सकाळ

# ‘रवळनाथ’ची कामगिरी अभिमानास्पद

## शरद मगर; गडहिंग्लजमध्ये ‘रवळनाथ’च्या मोबाईल बँकिंग सेवेस प्रारंभ

गडहिंग्लज, ता. १३ : माणुसकीच्या भावनेतून सहज, सुलभ गृहकर्ज आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विनम्र व तत्पर सेवेचे व्रत जोपासणाऱ्या श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीची कामगिरी आणि २५ वर्षातील यशाची वाटचाल गडहिंग्लज विभागासह कोल्हापूर जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे, असे गौरवोद्गार गडहिंग्लज पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शरद मगर यांनी काढले.

श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या मोबाईल बँकिंग सेवेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते. संस्थेच्या मोबाईल बँकिंग ॲपचे अनावरण मगर यांच्या हस्ते झाले.




गडहिंग्लज : रवळनाथ मोबाईल बँकींग ॲपचे अनावरणप्रसंगी शरद मगर, एम. एल. चौगुले, आर. एस. निळपणकर, रेखा पोतदार, बसाप्पा आरबोळे, डी. के. मायदेव, प्रकाश शहा, सुनील पट्टणशेट्टी.

राष्ट्रीयकृत, सहकारी व खाजगी बँकांच्या बरोबरीने एटीएम व मोबाईल बँकिंग सुविधा सभासद व ग्राहकांना उपलब्ध करून देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. त्यामुळे ग्राहक सेवा अधिक गतिमान होणार आहे. मोबाईल ॲपव्दारे संस्थेच्या ग्राहकांना मोबाईलवरून कोणत्याही इतर बँकेतील खात्यावर आरटीजीएस, एनईएफटी करण्याची सुविधा आहे. रवळनाथ बँकेतील कोणत्याही शाखेतील खात्यावर व्यवहार करण्याची सुविधा, डिजीटल पासबुक व रवळनाथमधील आपल्या सर्व खात्यांचा अपडेट बॅलेन्सची माहिती मिळू शकते. तसेच मिस्ड कॉल दिल्यास खात्यावरील शिल्लक रक्कमेची माहिती मिळणार आहे, याचा सर्व ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन चौगुले यांनी केले. मगर म्हणाले, ‘झेप स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन ॲकेडमी’, महिला व आजी-माजी सैनिकांना दिलेली गृह कर्जातील सूट आणि विविध सामाजिक उपक्रमातून संस्थेची सामाजिक बांधिलकी अधोरेखित होते. यावेळी मोबाईल बँकिंग कार्यान्वीत केल्याबद्दल संस्थेचे सिस्टीम मॅनेजर विजय बुगडे यांचा श्री. मगर यांच्याहस्ते सत्कार झाला.

संचालक रेखा पोतदार, बसाप्पा आरबोळे. सुनिल पट्टणशेट्टी, प्रकाश शहा, शिवानंद घुगरे, जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड, सर्व शाखाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सीईओ दत्तात्रय मायदेव यांनी स्वागत तर प्रशासन अधिकारी सागर माने यांनी सूत्रसंचलन केले. संचालक डॉ. आर. एस. निळपणकर यांनी आभार मानले.

### काळाबरोबरच चालणारी संस्था

पुरोगामी विचारांचा वारसा लाभलेल्या गडहिंग्लज नगरीतील ``रवळनाथ`` च्या प्रधान कार्यालयाच्या कार्पोरेट बँकेसारख्या भव्य वास्तूवरूनच संस्थेचे व्हिजन स्पष्ट होते. मोबाईल बँकिंग सेवेच्या माध्यमातून संस्थेने काळाबरोबर चालण्याचा प्रयत्न केला आहे. सहकारात असूनही राजकारण विरहित असणारी ही दुर्मिळ संस्था आहे, अशा शब्दात श्री. मगर यांनी संस्थेचा गौरव केला.

Kolhapur, Gadhinglaj-Today
14/02/2022 Page No. 4

पुण्यनगरी

# 'रवळनाथ'ची कामगिरी अभिमानास्पद

## गटविकास अधिकारी शरद मगर; रवळनाथच्या मोबाईल बँकिंग सेवेस प्रारंभ

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीची कामगिरी आणि २५ वर्षांतील यशाची वाटचाल गडहिंग्लज विभागासह कोल्हापूर जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे, असे गौरवोद्गार गटविकास अधिकारी शरद मगर यांनी काढले.

रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या मोबाईल बँकिंग सेवेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले होते. मोबाईल बँकिंग ॲपचे अनावरण गटविकास अधिकारी मगर यांच्या हस्ते करण्यात आले. बदलत्या काळानुसार राष्ट्रीयीकृत, सहकारी व खासगी बँकांच्या बरोबरीने एटीएम व मोबाईल बँकिंग इ. सुविधा आपल्याही सभासद व ग्राहकांना उपलब्ध करून देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. मोबाईल ॲपद्वारे संस्थेच्या ग्राहकांना त्यांच्या मोबाईलवरून कोणत्याही इतर बँकेतील खात्यावर आरटीजीएस, एनईएफटी करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. सर्व खात्यांच्या अपडेटेड बॅलेन्सची माहिती मिळू शकते. याचा सर्व ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थापक चौगुले यांनी केले.




रवळनाथमध्ये मोबाईल बँकिंग ॲपचे अनावरण करताना गटविकास अधिकारी शरद मगर, संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, आर. एस. निळपणकर व अन्य.

मगर म्हणाले, झेप स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन अकॅडमी, महिला व आजी-माजी सैनिकांना दिलेली गृह कर्जातील सूट आणि विविध सामाजिक उपक्रमांतून संस्थेची सामाजिक बांधिलकी अधोरेखित होते. यावेळी संस्थेचे सिस्टीम मॅनेजर विजय बुगडे यांनी परिश्रम घेऊन मोबाईल बँकिंग कार्यान्वित केल्याबद्दल मगर यांच्या हस्ते बुगडे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी संचालक रेखा पोतदार, बसाप्पा आरबोळे, सुनील पट्टणशेट्टी, प्रकाश शहा, शिवानंद घुगरे, बाबासाहेब मार्तंड आदी उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय मायदेव यांनी प्रास्ताविक केले. प्रशासन अधिकारी सागर माने यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर यांनी आभार मानले.

पुढारी



गडहिंग्लज : येथे 'श्री रवळनाथ' मोबाईल बँकिंग ॲपचे अनावरण करताना गटविकास अधिकारी शरद मगर. शेजारी एम. एल. चौगुले, आर. एस. निळपणकर, रेखा पोतदार, बसाप्पा आरबोळे, डी. के. मायदेव व अन्य.

# 'श्री रवळनाथ'च्या मोबाईल बँकिंग सेवेस प्रारंभ

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

येथे श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या मोबाईल बँकिंग सेवेस प्रारंभ झाला. गडहिंग्लज पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शरद मगर यांच्या हस्ते मोबाईल बँकिंग ॲपचे अनावरण झाले. संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय मायदेव यांनी स्वागत केले. यावेळी बीडीओ मगर यांनी माणुसकीच्या भावनेतून सहज, सुलभ गृहकर्ज आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विनम्र व तत्पर सेवेचे व्रत जोपासणाऱ्या श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीची कामगिरी आणि २५ वर्षांतील यशाची वाटचाल गडहिंग्लज विभागासह कोल्हापूर जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे, असे प्रतिपादन केले.

संस्थेचे सिस्टीम मॅनेजर विजय बुगडे यांचा विशेष सत्कार झाला. यावेळी संचालक रेखा पोतदार, बसाप्पा आरबोळे, इंजि. सुनील पट्टणशेट्टी, प्रकाश शहा, व्यवस्थापक शिवानंद घुगरे, जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड आदी उपस्थित होते. प्रशासन अधिकारी सागर माने यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर यांनी आभार मानले.

My Kolhapur Edition
Feb 14, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in